11583

दिनांक
जिल्हाधिकारी कार्यालय सिंधुदुर्ग
सिंधुदुर्गनगरी पिन- ४१६८१२

**जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी कार्यालय सिंधुदुर्ग**
**(महसूल शाखा)**
**ता.कुडाळ. जि.सिंधुदुर्ग - 416812**
**दूरध्वनी क्रमांक :- 02362-228856 ई-मेल :- rbsindhudurg@gmail.com**

कांदळवन संदर्भ
REV-20249/मशा-4/कावी-391/09/2022 दि. 27/09/2022

प्रति,

मा. सदस्य सचिव,
राज्य कांदळवन संरक्षण व
संवर्धन सनियत्रंण समिती,
तथा उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष,
302, वेक फिल्ड हाऊस, 3 रा मजला,
ब्रिटानिया रेस्टॉरंट जवळ, बॅलार्ड इस्टेट,
फोर्ट, मुंबई 400001

10 OCT 2022

विषयः पारवाडी विकास मंडळ यांच्या कांदळवन तक्रारीबाबत. ( तक्रार क्र. 158) आचरा पारवाडी येथील कोळंबी प्रकल्पाजवळील कांदळवनाच्या तोडीबाबत. अज्ञात व्यक्ती विरुध्द मा. उच्च न्यायालयाकडील जनहित याचिका क्र.87/2006 व पर्यावरण (संरक्षण) अधिनियम 1986 मधील तरतुदीनुसार फिर्याद नोंद केलेबाबत.

संदर्भः 1) आपलेकडील पत्र क्र.ल.ले./का.स./39/सन2021-22 दि. 23/09/2021.
2) या कार्यालयाकडील पत्र क्र. REV/मशा-04/कावी-196/कांदळवन/10/2021 दि. 06/10/2021.
3) उपविभागीय अधिकारी (महसूल), कुडाळ तथा अध्यक्ष, तालुकास्तरीय कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती यांजकडील पत्र क्र.जबाबी/कांदळवन/तोड/गु.नोंद/07/2022 दि. 14/07/2022 रोजीचा अहवाल दि. 21/07/2022 रोजी संकलनाकडे प्राप्त.
4) या कार्यालयाकडील पत्र क्र. जबाबी/कांदळवन/तोड/गु.नों/07/2022 दि. 14/07/2022

उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई
आवक क्रमांक 4884
दिनांक 30/11/2022
मुख्य लिपिक उप वनसंरक्षक

Mangrove cell committee

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत संदर्भ क्र. 1 अन्वये पारवाडी विकास मंडळ, पारवाडी व सरपंच, ग्रामपंचायत आचरा यांनी मौजे आचरा पारवाडी ता. मालवण येथील कोळंबी प्रकल्पाजवळील कांदळवन तोडबाबतच्या तक्रारीबाबत कार्यवाही करुन स्थळ पाहणी अहवाल, पंचनामा, संबंधीत जागेचे Geo taged छायाचित्रांसहीत माहिती सादर करणेबाबत कळविले होते.

प्रस्तुत प्रकरणी उक्त संदर्भ क्र. 2 अन्वये उपविभागीय अधिकारी कुडाळ यांजकडे कांदळवन तक्रारीबाबत कार्यवाही करुन स्थळ पाहिणी अहवाल, पंचनामा, संबंधीत जागेचे Geo taged छायाचित्रांसहीत अंतिम कार्यवाहीचा अहवाल सादर करणेबाबत कळविले होते. त्यानुसार संदर्भ क्र. 3 अन्वये उपविभागीय अधिकारी (महसूल), कुडाळ तथा अध्यक्ष, तालुकास्तरीय कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती यांनी पारवाडी विकास मंडळ, पारवाडी व सरपंच, ग्रामपंचायत आचरा ता. मालवण यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने जून 2021 ते जुलै 2021 च्या दरम्यान

मौजे डोंगरेवाडी ता. मालवण जि. सिंधुदुर्ग येथील स.नं 50 हि.नं. 01 मध्ये 32 (अंदाजे) कांदळवन वृक्षांची तोड व मौजे डोंगरेवाडी ता. मालवण जि. सिंधुदुर्ग येथील स.नं. 48 हि.नं. 6 व स.नं. 49 हि.नं. 1 मध्ये 31 कांदळवन वृक्षाची तोड केलेकामी प्रथम अज्ञात व्यक्ती विरुध्द मा. उच्च न्यायालयाकडील जनहित याचिका क्र. 87/2006 मधील सुचनेनुसार व पर्यावरण (संरक्षण) अधिनियम 1986 मधील नियम, आदेश, निर्देश, तरतुदींनुसार पोलिस ठाणे आचरा येथे FIR क्र.0013, दि. 13/07/2022 रोजी दाखल केल्याबाबत कळविले आहे. त्याअनुषंगाने उक्त संदर्भ क्र. 4 अन्वये उपविभागीय अधिकारी कुडाळ यांनी वरील प्रमाणे या कार्यालयाकडे सादर केलेला अहवाल आपले कार्यालयाकडे सादर केलेला आहे.

तरी पारवाडी विकास मंडळ, पारवाडी व सरपंच, ग्रामपंचायत आचरा यांनी दाखल केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने कार्यवाही पूर्ण झाल्याने सदरची तक्रार वगळण्यास विनंती आहे. सोबत उपविभागीय अधिकारी (महसूल) कुडाळ तथा अध्यक्ष, तालुकास्तरीय कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती यांनी या कार्यालयास दिलेल्या गुन्ह्यातील प्रथम खबर अहवालाची छायाकिंत प्रती आहेत.

वरीलप्रमाण अहवाल सविनय सादर.

( श्रीधर पाटील)
तहसिलदार ( महसूल )
जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग करीता

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** सिंधुदुर्ग **P.S.(ठाणे):** आचरा **Year (वर्ष):** 2022

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0013 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 13/07/2022 17:06 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | पर्यावरण (संरक्षण) अधिनियम १९८६ | 15 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन
   **Time Period (कालावधी):**
   **Date From (दिनांक पासून):** 01/06/2021
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 31/07/2021
   **Time From (वेळेपासून):** 00:00 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 00:00 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 13/07/2022 **Time (वेळ):** 15:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**
**Entry No. (नोंद क्र.):** 010 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 13/07/2022 16:18 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** उत्तर, 5 किमी
**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** आचरा डोंगरेवाडी,मालवण

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** वंदना मधुकर खरमाळे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1980 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

(h). **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | उपविभागीय अधिकारी महसुल कुडाळ,कुडाळ,कुडाळ,सिंधुदुर्ग,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | उपविभागीय अधिकारी महसुल कुडाळ,कुडाळ,कुडाळ,सिंधुदुर्ग,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अनोळखी 1 | | | |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | इतर | वन उत्पादने | स.न./50/1 मध्ये 32 व स.न./48/6, 49/01 मधील 31 अंदाजे | 0.00 |

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचें एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 0.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

ममी श्रीम. वंदना मधुकर खरमाळे, वय - 42 वर्षे, उपविभागीय अधिकारी ( महसूल ), कुडाळ, मोबाईल नंबर 9921462599 समक्ष हजर राहून लिहून देते की, मी दिनांक 10.09.2019रोजीपासून उपविभागीय अधिकारी ( महसूल ), कुडाळ म्हणून कार्यरत आहे. सरपंच, ग्रामपंचायत आचरा, तालुका मालवण, जिल्हा सिंधुदुर्ग यांनी त्यांचेकडील पत्र जा.नं.ग्रा.पं.आचरा / 355/2021, दि. 06.07.2021 अन्वये आचरा ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रात डोंगरेवाडी पारवाडी येथील कोळंबी प्रकल्पालगत झालेल्या कांदळवन तोडीबाबत पाहणी करुन योग्य ती कारवाई करणेबाबत उपविभागीय अधिकारी ( महसूल ) कार्यालय, कुडाळ येथे तक्रार केलेली आहे. तसेच आचरा पारवाडी येथील कोळंबी प्रकल्पाजवळील कांदळवनाच्या तोडीबाबतची तक्रार पारवाडी विकास मंडळ यांनी दि. 18.8.2021 रोजीचे ईमेलव्दारे मा. सदस्य सचिव, राज्य कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती तथा उप वनसंरक्षक, कांदळवन कक्ष मुंबई यांचेकडे केलेली असून निवासी उपजिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांचेकडील पत्र REV-मशा-4/कावी-196/कांदळवन/10/2021, दि. 06.10.2021 चे पत्रान्वये सदर तक्रारीबाबत स्थळपाहणी करुन स्थळ पाहणी अहवाल, पंचनाम्यासहीत सादर करणेबाबत कळविण्यात आलेले आहे. सदर तक्रारीबाबत या कार्यालयाकडील पत्र क्र. जबाबी / कांदळवन / कावि-501 / 2021, दि. 14.07.2021 अन्वये तहसीलदार मालवण व सदस्य सचिव, कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण तालुकास्तरीय समिती तथा वन क्षेत्रपाल, कुडाळ यांना कांदळवनाची तोड झालेल्या प्रत्यक्ष ठिकाणी भेट देऊन पंचनामा करुन अहवाल सादर करणेच्या सूचना दिलेल्या होत्या. त्यानुसार तालुकास्तरीय समितीमार्फत आचरा-पारवाडी व गाऊडवाडी ता. मालवण येथील कोळंबी प्रकल्पालगतची कांदळवनाची तोड केलेल्या ठिकाणाची दि. 27.10.2021 रोजी प्रत्यक्ष स्थळ पाहणी केलेली आहे. सदस्य सचिव तथा वनक्षेत्रपाल कुडाळ यांनी जा. क्र.-ब /कांदळवन-तोड / आचरा -पिरावाडी / 875 /2021-22, दि. 25.03.2022 अन्वये सविस्तर अहवाल पंचनाम्यासहीत सादर केलेला आहे. गाव मौजे डोंगरेवाडी येथील मे. ट्रायटन मरिनेक्स प्रा.लि. कंपनीच्या कोळंबी प्लटमध्ये स्टोअर रुमच्या पाठीमागे असलेल्या नाल्याच्या ठिकाणची पाहणी केली असता उपस्थित भूमी अभिलेख मालवण यांचे प्रतिनिधी श्री. ओंकार सु. आपटे, प्र. भूकरमापक यांनी सदर क्षेत्र मौजे डोंगरेवाडी मा.स.नं. 50/1 असल्याचे सांगितले. आज रोजी उक्त मिळकत श्री देव रामेश्वर आचरे यांचे नावे आहे.प्रत्यक्ष पाहणीवेळी तक्रारदार यांनी कांदळवन तोड केलेले क्षेत्र दाखवले सदर क्षेत्राची पाहणी करता सदर क्षेत्रात चार ते पाच महिन्यापूर्वी तोड झालेली काही जुनाट वाळलेली मुळे दिसून आली. सदर क्षेत्र मशिनच्या सहाय्याने साफ केल्याचे दिसून आले. तक्रारदार पारवाडी, डोंगरेवाडी ग्रामस्थ मंडळ पारवाडी आचरा यांचे प्रतिनिधी यांनी बाधित क्षेत्रात कांदळवन प्रजाती होती ती प्लट साफसफाई करण्याचे उद्देशाने तोडली असल्याचे सांगितले. कांदळवन कक्ष मालवणचे प्रतिनिधी वनरक्षक कांदळवन मालवण यांनी सदरची मुळे ही हुरा या कांदळवन प्रजातीची मुळे असून लगतच्या क्षेत्रातील कांदळवन प्रजाती हुरा या जातीची असल्याचे सांगितले. सदर साफसफाई केलेल्या क्षेत्रास

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): kuldeep sambhaji patil
**Rank**(पद): SI (Sub-Inspector)
**No.**(सं.): psi